माहितीचा अधिकार

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ अमरावती**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**

तक्रार क्र. अम- ६५/२०२२

तक्रारकर्ता श्री.गजानन सदाशिव पवार.
रा.मु.पो.मुळावा, ता.उमरखेड, जि.यवतमाळ.
विरुध्द

**जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम उपविभाग, उमरखेड, ता.उमरखेड, जि.यवतमाळ.**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, पुसद, ता.पुसद, जि.यवतमाळ**
**तक्रार सुनावणी दिनांक - २५.०७.२०२४.**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

प्रस्तुत प्रकरणी यापुर्वी दि.०२.११.२०२३ रोजी सुनावणी घेवून खालील प्रमाणे अंतरिम आदेश पारित करण्यात आला होता.

" १. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सदर आदेश प्राप्त होताच २ आठवड्याच्या कालावधीत उपलब्ध असलेली जोडपत्र-अ मध्ये नमुद केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस तात्काळ विनामुल्य प्रदान करावी.

२. परिच्छेद क्र. ३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे संबंधित प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांनी त्यांचा लेखी खुलासा सदर आदेश प्राप्त होताच २ आठवड्यांच्या आत आयोगास सादर करावा."

वरील पारित अंतरिम आदेशाचे अनुपालनासाठी प्रस्तुत तक्रारीवर आज दि.२५.०७.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. त्यानुसार सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. उत्तरवादी हे अनुपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे, तक्रारकर्ता यांचा युक्तीवादावरुन असे निदर्शनास येते की, तक्रार क्र.६५/२०२२ यात दि.०२.११.२०२३ रोजी सुनावणी घेवून पारित केलेल्या अंतरिम आदेशात वरील

प्रमाणे निर्देश देण्यात आले होते. त्यानुषंगाने प्राधिकरणाचे वतीने द्वितीय अपील १७४८/२०१६ यात दि.३०.०५.२०१५ रोजी पारित निर्णयाच्या अंमलबजावणी बाबत सविस्तर खुलासा सादर करण्यात आलेला आहे. त्यात अपिलकर्ता यांच्या दि.१५.०२.२०१६ रोजीच्या जोडपत्र-अ नूसार मागितलेली मुद्देनिहाय माहिती म्हणजे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, उमरखेड येथे करण्यात आलेले बांधकाम, त्यावर झालेला खर्च, काम करण्यात आलेल्या कंत्राट दाराचे तपशील, देयक अदा करण्यात आल्याबाबत कागदोपत्री असलेला पुरावा इत्यादी माहिती माहितीचा समावेश असून, वरील माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविण्यात आली व त्याची एक प्रत आयोगास नोंदणीकृत टपालाद्वारे तसेच ईमेल द्वारा पाठविण्यात आलेली आहे. तसेच तत्कालीन अपिलीय अधिकारी यांनी देखील तक्रारकर्ता श्री.पवार यांचे प्रथम अपील अर्जावर सुनावणी आयोजित केली असल्यबाबतची कागदोपत्री उपलब्ध असलेली तपशील सादर केले असून, तक्रारकर्ता यांना तीन वेळा सुनावणीसाठी प्राचारण करण्यात आले मात्र ते हजर नसल्याचे नमूद करीत प्रथम अपील अर्ज निकाली काढण्यात आला असल्याचा पूरावा सादर केलेला आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेता, तक्रारकर्ता यांनी कुठलीच माहिती मिळाली नसल्याचा आक्षेप नोंदविला आहे. आयोगास सादर केलेल्या माहितीचा एक संच तक्रारकर्ता यांच्या नोंदणीकृत ईमेल पत्त्यावर तात्काळ प्रदान करण्याच्या निर्देशासह प्रस्तुत तक्रार अर्ज नस्तीबध्द करण्यात येत आहे.

## आदेश

**उपरोक्त आदेशाच्या अधिन राहून तक्रार अर्ज नस्तीबध्द करण्यात येत आहे.**

(राहुल भा.पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ अमरावती

राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती

ठिकाण : अमरावती
दिनांक : २५.०७.२०२४

जावक क्रमांक ७२९८ दिनांक 30 OCT 2024

निर्गमित केले
30 NOV 2024